सोलापूर विद्यापीठ
सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
**सोलापूर** - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
website: http://su.digitaluniversity.ac

**SOLAPUR UNIVERSITY**
Solapur Pune National Highway, Kegaon,
**Solapur** - 413 255 (Maharashtra)
EPABX: 0217-2744763, 66,67 Ext-124
Email : bcudsu@gmail.com

**Ref. No. : SUS/BCUD/PGBUTR/** 8576 **Date:** 29 NOV 2014

## परिपत्रक

### [ Ph.D / M.Phil अभ्यासक्रम ]

मा.प्राचार्य / संचालक, सर्व संलग्नित पीएच.डी / एम.फिल अभ्यासक्रमाचे संशोधन सुविधा केंद्र / ठिकाण व विद्यापीठ शैक्षणिक संकुले यांना आदेशान्वये प्रस्तुत परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, आपल्या संशोधन सुविधा केंद्र / ठिकाणांत पीएच.डी / एम.फिल अभ्यासक्रमासाठी प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज विद्यापीठातील पात्रता विभागाकडे पात्रता शुल्काच्या रकमेसह विहीत मुदतीत म्हणजेच प्रवेश दिल्यानंतर एका महिन्याच्या कालावधीमध्ये सादर करावेत. सदर अर्ज विहीत मुदतीमध्ये सादर न केल्यास विद्यापीठ नियमाप्रमाणे दंडाची आकारणी केली जाईल.

पीएच.डी कोर्सवर्क परीक्षा अर्ज ही परीक्षा विभागाकडे सदर विभागाने परिपत्रक प्रसिध्द / निर्गमित केल्यानंतर विहीत मुदतीत सादर करावेत. पीएच.डी / एम.फिल अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज व कोर्सवर्क परीक्षा अर्ज महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ कार्यालयात पीजीबीयुटीआर विभागामध्ये स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

एखाद्या संशोधन सुविधा केंद्रातून अशा प्रकारचे अर्ज संबंधित पात्रता व परीक्षा विभागाकडे सादर न केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस / परिणामास आपले महाविद्यालय / शैक्षणिक संकुल जबाबदार असेल याची कृपया नोंद घ्यावी. सदर परिपत्रक विद्यापीठ संकेत स्थळावर पीएच.डी / एम.फिल विभागात उपलब्ध आहे.

संचालक
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत :- माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव
१.मा.प्राचार्य, संलग्नित महाविद्यालय, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
२.मा.संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
३.पात्रता विभाग व परीक्षा विभाग, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर